**कार्यालय पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग,जालना**
**टोल फ्री क्रमांक - 1064**
**कार्यालय दुरध्वनी क्र :- 02482-220252**

**:: प्रेस नोट ::** **दिनांक :- 09.11.2020.**

**जिल्हा परीषद जालना येथील श्री. किसन दत्तात्रय लोखंडे, वय 57 वर्ष व्यवसाय नोकरी वरीष्ठ सहाय्यक, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परीषद जालना यांना 10,000/- रुपयांची लाच घेतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना च्या पथकाने पकडले.**

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | आरोपीचे नाव, हुद्दा व पत्ता | :- | **आलोसे श्री. किसन दत्तात्रय लोखंडे, वय 57 वर्ष व्यवसाय नोकरी वरीष्ठ सहाय्यक, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परीषद जालना रा. प्लॉट क्रं 137 सहकार बॅक कॉलनी, जुना जालना जि. जालना** |
| 2 | गुन्हा घडला तारीख व ठिकाण | :- | **दिनांक 09.11.2020 रोजी सामान्य प्रशासन विभाग, कार्यालय जिल्हा परीषद जालना येथे.** |
| 3 | लाचेची रक्कम | :- | **10,000/- रुपये.** |

याबाबत हकीगत अशी की, यातील तक्रारदार यांनी दिनांक 09.11.2020 रोजी तक्रार दिली की, ते स्वत: पंचायत समीती जाफ्राबाद येथे कनिष्ठ सहाय्यक म्हणुन नोकरीला होते, परंतु त्यांना तीन महिन्यांपुर्वी सेवेतुन कमी केले होते, चौकशीअंती त्यांना पुन्हा सेवेत सामावुन घेण्यासाठी मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी आदेशीत केले होते, त्यांना पुन्हा सेवेत घेण्याचा आदेश देण्यासाठी वरीष्ठ सहाय्यक श्री. किसन दत्तात्रय लोखंडे यांनी तक्रारदार यांचेकडुन यापुर्वीच 20,000/- रुपये घेतले होते, व आज पुन्हा त्यांना सेवेत घेण्याचा आदेश देण्यासाठी वरीष्ठ सहाय्यक श्री. किसन दत्तात्रय लोखंडे यांनी 10,000/- रुपये लाचेची मागणी केली. सदर कामासाठी तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना येथे संपर्क साधून तक्रार दिली. सदर तक्रारीवरुन आज दिनांक 09.11.2020 रोजी सापळा लावला असता वरीष्ठ सहाय्यक श्री. किसन दत्तात्रय लोखंडे यांनी तक्रारदार यांना 10,000 /- रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पण्ण झ ाले तसेच त्यांनी तक्रारदार यांचेकडुन स्वत: पंचासमक्ष 10,000/- रुपये लाचेची रक्कम स्वीकारली असतांना त्यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालना पथकाने सामान्य प्रशासन विभाग, कार्यालय ज़िल्हा परीषद जालना येथे रंगेहाथ पकडण्यात आले.

लोकसेवक श्री. किसन दत्तात्रय लोखंडे, वय 57 वर्ष व्यवसाय नोकरी वरीष्ठ सहाय्यक, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परीषद जालना रा. प्लॉट क्रं 137 सहकार बॅक कॉलनी, जुना जालना जि. जालना यांचे विरुध्द गुन्हा दाखल करण्याबाबत पुढील कार्यवाही चालु आहे.

**तसेच अॅन्टी करप्शन ब्युरो कडुन आवाहन करण्यात येते की, कोणी लोकसेवक शासकीय कामासाठी लाचेची मागणी करीत असल्यास किंवा खाजगी व्यक्ती मार्फत कोणी लाचेची मागणी करीत असल्यास 02482-220252, तसेच टोल फ्री क्रमांक 1064 वर संपर्क करावा. तसेच पोलीस उप अधिक्षक जालना मो.नं. 8975762906, पोलीस निरीक्षक मो.नं. 8390757835, 9823216788 वर संपर्क करावा.**

पोलीस उप अधिक्षक ,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,जालना.